# विस्तार शिक्षण संचालनालय,
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, -४३१४०२

जा.क्र. १४८ / २०२५
दिनांक २० - ०२ - २०२५

## जाहीर प्रगटन

**विषयः- दर पत्रक मागविणे बाबत.**

विस्तार शिक्षण संचालनालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, यांच्यातर्फे शेतीभाती मासिकाची एप्रील-२०२५ ते मार्च-२०२६ या कालावाधी करीता छपाई करण्यासाठी विविध ऑफसेट धारकाकंडून दर पत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकाची किंमत रू. ५००/- (रूपये पाचशे केवळ) असून शेतीभाती मासिकाच्या छपाईचे विवरण,नियम व अटी दरपत्रकासोबत जोडलेल्या आहेत. दरपत्रक शेतीभाती कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस सोडून दिनांक २४/०२/२०२५ ते ०५/०३/२०२५ दुपारी ४.०० या कालाधीत विक्रीसाठी उपलब्ध राहतील व भरलेली दरपत्रके दिनांक ०५/०३/२०२५ ला दुपारी ५.३० पर्यंत किंवा त्या पुर्वी कार्यालयीन कामकाजाच्या वेळी या कार्यालयात मोहोर बंद पाकीटात सादर करावेत.

परभणी
दिनांक २०/०२/२०२५

संचालक
**विस्तार शिक्षण,**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी, -४३१४०२
फोन क्र. (०२४५२) २२८६०१

**प्रतः** नोटीस बोर्ड
१.विस्तार शिक्षण संचालनालय / प्रशासकीय इमारत /शेतीभाती कार्यालय, वनामकृवि, परभणी.
२.जिल्हाधीकारी कार्यालय/महानगरपालीका कार्यालय परभणी
३.वनामकृवि वेबसाईट (संकेत स्थळ)

# विस्तार शिक्षण संचालनालय,
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, -४३१४०२

## शेतीभाती मासिक २०२५-२०२६ छपाई बाबतच्या अटी व शर्ती

विस्तार शिक्षण संचालनालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, यांच्यातर्फे सन २०२५-२०२६ या वर्षात **शेतीभाती** मासिक प्रत्येक महिन्यात एक अंक या प्रमाणे (एप्रील-२०२५ ते मार्च-२०२६) प्रकाशित करावयाचे आहे. शेतीभाती मासिक छपाई करण्यासाठी संचालक, विस्तार शिक्षण वनामकृवि परभणी दरपत्रक मागवित आहेत.

दरपत्रक भरण्यापूर्वीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

- सदरील दरपत्रकाचा करार एप्रील-२०२५ ते मार्च-२०२६ या कालावाधी करीता लागू राहील.
- दरपत्रकाची किंमत रू. ५००/- (रूपये पाचशे केवळ) असून ती रक्कम परत केली जाणार नाही .
- दरपत्रका सोबत खालील कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे.कागदपत्रे न जोडल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

  (अ) संस्थेचा नोंदणी दाखला (ब) जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र (क) पॅन नबंर (ड) आयकर विवरण (मागील वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र)

  (इ) अनामत रक्कम रूपये ५०००/- (राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष)
- दरपत्रकात भरलेले दर सर्व करांसहित असावेत व दरपत्रका मध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड असु नये. खाडाखोड अढळल्यास दरपत्रक ग्राह्य धरल्या जाणार नाही.
- दरपत्रकासोबत अनामत रकमेचा राष्ट्रीयकृति बँकेचा रू.५०००/-धनाकर्ष जोडावा.ज्या फर्मचे दरपत्रक मंजुर होणार नाही त्या दरपत्रकाची अनामत रक्कम परत केली जाईल.
- ज्या फर्मचे दरपत्रक मंजूर झाल्या नंतरही त्या फर्मने काम करण्यास नकार दिल्यानंतर त्या फर्मची अनामत रक्कम जप्त केल्या जाईल.
- ज्या फर्मचे-दरपत्रक मंजूर होईल त्यांना एकूण रकमेच्या ५% सुरक्षा ठेव म्हणून विद्यापिठाकडे जमा करावी लागेल. सुरक्षा ठेव काम संपल्यावर (मार्च-२०२६ नंतर) परत करण्यात येईल.
- सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे रू.५००/- च्या बाँडपेपरवर UNDERTAKING दयावे लागेल

- शेतीभातीचे एकूण वर्षभरात एप्रील-२०२५ ते मार्च-२०२६ या कालावधीत प्रती महिना असे एकूण १२ अंक (प्रती अंक मुख व मलपृष्ठ धरून २८ पेजेस) असतील.

- दरपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कागद प्रकार व आकार तसेच छपाई कामात सुबकता नसल्यास व काम वेळेवर न झाल्यास काम नाकारण्यात येईल व परिणामी सुरक्षा ठेव जप्त केली जाईल.

- आवश्यकता वाटल्यास दरपत्रक मंजूर होण्यापूर्वी समिती कडून आपल्या कडील उपलब्ध छपाई यंत्रसामुग्री व इतर अनुषंगीक सुविधा आदिबाबत पडताळणी करण्यात येईल व समितीचे समाधान झाल्यासच छपाईचे काम देण्यात येईल.

- शेतीभातीच्या छपाईच्या कामापोटी कोणत्याही प्रकारचा अग्रीम देण्यात येणार नाही. प्रत्येक महिन्याचा अंक छपाई केल्यानंतर त्या महिन्याचे देयक आदा करण्यात येईल. शेतीभाती मासिकाची प्रत्येक महिण्याची pdf फाईल करून देयकासोबत या कार्यालयास द्यावी लागेल.

- शेतीभाती मासिकाचे लेख आपलेकडे प्राप्त झाल्यानंतर छपाईपुर्वी अनुभवी प्रुफ रीडरकडून तपासून चार दिवसाच्या आत या कार्यालयात तांत्रिक तपासणीसाठी पाठवावेत.

- छपाई केलेल्या अंकाच्या सर्व प्रती प्रत्येक महिन्याच्या ३० तारखे पुर्वी संचालक, विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या कार्यालयात पोहोचाव्या लागतील. **अंक उपरोक्त दिनाकांस न दिल्यास प्रति दिन रूपये ५/- प्रति प्रत** याप्रमाणे दंडाची रक्कम आकारली जाईल.

- दरपत्रक मंजूर करणे अथवा नामंजूर करणे, अंकाची संख्या वाढविणे वा कमी करणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार संचालक, विस्तार शिक्षण यांच्याकडे राहतील.

- छपाईचे आदेश ५०० च्या पुढे देण्यात येतील (उदा.६०० अंकाचे छपाईचे आदेश दिले तर देयकाची रक्कम ६०० अकांचीच देण्यात येईल )

- शासनाच्या नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू असलेले TDS व इतर अनुज्ञय कर आपल्या देयकातून कपात करण्यात येतील

Directorate of Extension Education V.N.M.K.V., Parbhani

**संचालक, विस्तार शिक्षण,**
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,**
**परभणी, -४३१४०२**

Directorate of Extension Education • V.N.M.K.V., Parbhani •

# दरपत्रक

## शेतीभाती मासिक २०२५-२०२६ च्या छपाई बाबतचे दरपत्रक

| अ. क्र | विवरण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेतीभाती मासीक अंक आकार - ८.० X १०.५ इंच<br>• कव्हर व मजकुराची आतील पाने - एकूण १४ पाने (पाठपोट) २८ पेजेस, मुख पृष्ठ, कव्हर २ व ३, मल पृष्ठ व आतील मचकुर चाररंगी फोटोसह छपाई, डिझायनींग, फोटो स्कॅनिंग,<br>• पेपर - ९० जीएसएम आर्ट पेपर, ए ग्रेड मील<br>• बायडींग - सेंटर स्टीचींग<br>• प्रती - ५०० ते १००० | | | | | | |
| | छपाईचे दर | ५०० प्रतीसाठी प्रतिनग दर रुपये | ६०० प्रतीसाठी प्रतिनग दर रुपये | ७०० प्रतीसाठी प्रतिनग दर रुपये | ८०० प्रतीसाठी प्रतिनग दर रुपये | ९०० प्रतीसाठी प्रतिनग दर रुपये | १००० प्रतीसाठी प्रतिनग दर रुपये |
| | एकूण १४ पाने, (पाठपोट) २८ पेजेस (कव्हरसहित) एका वर्षातील एकुण १२ अंक | | | | | | |

टीप : छपाईचेकाम: शेतीभाती मासिक वनामकृवि प्रमाणे

दरपत्रक देणा-या व्यक्तीचे नाव

स्वाक्षरी व शिक्का

Director
Extension Education
V.N.M.K.V.,Parbhani

Directorate of Extension Education
V.N.M.K.V., Parbhani

## VI. AGREEMENT

**(To be submitted on bond paper of Rs.500/-)**

I/We agree and accept the terms and conditions of the Quotation and also it is binding on me / our part to fulfill all the requirements as specified in the Quotation for Printing of Shetibhati Magazine for the year 2025-26 published by the Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani.

Name of the Firm with full Address

Signature with Seal

Place:

Date:

GST No.

Director
Extension Education
V.N.M.K.V.,Parbhani